**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी......**

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१४/प्र.क्र.२०८/एसएम-२**

**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**

**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२**

दिनांक: **२५ जून,२०१४**

**वाचा**

**शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४.**

**प्रस्तावना**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये २२१७ संस्थांच्या शाळा पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. तथापि, सदर शासन निर्णयामध्ये पात्र झालेल्या प्रस्तावांपैकी काही प्रस्तावांच्या शाळांच्या बाबतीत त्यांनी मूळ प्रस्तावामध्ये मागणी केल्यानुसार अभ्यासक्रम, शाळांचे माध्यम, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक वा प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा मंजूर झाल्या नव्हत्या. तसेच अपात्र झालेल्या प्रस्तावांच्या बाबतीत संबंधित संस्थांनी आपल्या निवेदनाव्दारे बाबी शासनाच्या निदर्शनास आणल्या आहेत. संबंधित संस्थांची निवेदने तसेच, क्षेत्रीय कार्यालयाचे अभिप्राय/अहवालाच्या अनुषंगाने दुरुस्त्या व परवानगीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये अर्ज केलेल्या संस्थांनी त्रुटींची पूर्तता केल्यामुळे सोबतच्या विवरणपत्र'अ नुसार त्यांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यास परवानगी देण्यात येत आहे, संदर्भाधीन शासन निर्णय, दिनांक २६ फेब्रुवारी २०१४ अन्वये यापूर्वी उपरोक्त अधिनियमाखाली परवानगी देण्यात आली होती

त्या शासन निर्णयामधील अटी शर्ती या संस्थांनासुध्दा लागू राहतील. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेल्या शाळांपैकी विवरणपत्र 'ब' मध्ये दर्शविलेल्या शाळांबाबतीत त्यांच्या समोर दर्शविलेल्या दुरुस्ती/सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या अधिनियमाखाली शासन परवानगी दिलेल्या संस्थांच्या बाबतीत खालील बाबी शिक्षणाधिकारी यांनी (प्राथमिक/माध्यमिक) स्तरावर खातरजमा करण्यात यावी :-

१) शाळेने प्रस्तावित केलेली जागा/जमीन नियमानुसार किमान १ एकर सलग/अथवा शाळेसाठी योग्य असल्याची संबंधित शिक्षणाधिकारी यांनी खात्री करावी. सदर जागा/जमीन नियमानुसार आढळून न आल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

२) दाननिधी (कायम मुदतठेव) पावती संस्थेच्या नावावर, शाळा मान्यतेचा प्रस्ताव दाखल केल्याच्या दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरिता असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर त्याचे नूतनीकरण करण्याबाबत संबंधित, संस्थेची /शाळा व्यवस्थापनाची व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांची जबाबदारी राहील. अशी कायम मुदतठेवीची मूळ पावती संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचेकडे तारण म्हणून ठेवावी.

२. सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्था यांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०६२७१४०२३४३८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2014.06.27 14:03:30 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त

३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

८. विभागांतर्गत सर्व संचालक.

९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

१०.सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)

११.सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

१२.संबंधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपालिका

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

२. मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

३. मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

४. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. निवडनस्ती (एसएम २).

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २८ | पुणे | जयवंत एज्युकेशन फाऊंडेशन, सणसवाडी, ता.शिरुर, जि.पुणे | जयवंत पब्लिक स्कूल, सणसवाडी, तळेगांव ढमढेरे रोड, ता.शिरुर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| २९ | पुणे | फलक एज्युकेशनल सोसायटी, भाग्योदय नगर, कोंढवा, पुणे | ब्राईट फ्युचर स्कूल इंग्लिश मिडीयम, स.नं.४६/१४/१३/२ व ४८/२/१ कोंढवा खुर्द | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ३० | पुणे | ज्ञान विज्ञान आणि व्यक्ती विकास प्रतिष्ठान पुणे, महंमदवाडी रोड, हडपसर, पुणे-२८ | कॅपिटल इंग्लिश मिडीयम स्कूल, होळकरवाडी, ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ३१ | पुणे | श्री साई संस्कार एज्युकेशनल ट्रस्ट, विकासनगर, किवळे, देहुरोड | विब्स पब्लिक स्कूल, स.नं.४१, आवटे फॅब्रिकेशन जवळ, विकासनगर,किवळे, देहुरोड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ३२ | अहमदनगर | अनंत आशा प्रतिष्ठान, पुणे | अनंत आशा इंटरनॅशनल स्कूल, खेड, ता. कर्जत, जि. अहमदनगर | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ३३ | सोलापूर | निलाई बहुउद्देशिय समाजसेवी संस्था, सौंदरे, ता.बार्शी, जि. सोलापूर | महात्मा फुले प्राथमिक शाळा सौंदरे, ता.बार्शी, जि. सोलापूर | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| ३४ | सोलापूर | शिवनेरी प्रतिष्ठान, सोलापूर | गुटाळ मॉडर्न प्रशाला, पांगरे, ता. करमाळा, जि. सोलापूर | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ३५ | सोलापूर | ओमसाई बहु. संस्था, विजोरा, ता. वाशी, जि. उस्मानाबाद | सुयश प्राथमिक विद्यालय तांदुळवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| ३६ | सोलापूर | श्री.विठ्ठल शि.प्र. मं. जुजारपूर, ता.सांगोला, जि.सोलापूर | आदर्श विद्यामंदिर जुजारपूर, ता. सांगोला, जि. सोलापूर | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | मराठी | पात्र |
| ३७ | सोलापूर | शिवनेरी प्रतिष्ठान, सोलापूर | गुटाळ मॉडर्न प्रशाला, पांगरे, ता. करमाळा, जि. सोलापूर | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | मराठी | पात्र |
| ३८ | सोलापूर | जय मल्हार बहु.श्री.सा.कला क्रीडा मंडळ करांडेवाडी-बुध्देहाळ, ता. सांगोला, जि. सोलापूर | शांतीनिकेतन उच्च प्राथमिक विद्यालय तिप्पेहळळी, ता. सांगोला, जि. सोलापूर | नवीन | उच्च प्राथमिक | मराठी | पात्र |
| ३९ | कोल्हापूर | श्री आदर्श शिक्षण संस्था,कोथळी,ता.शिरोळ, ता.शिरोळ | आदर्श बालक मंदीर, कोथळी, ता.शिरोळ | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| ४० | कोल्हापूर | स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, २०४ ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर | न्यु मॉडेल इंग्लिश स्कूल, रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | नवीन | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| ४१ | कोल्हापूर | आनंद शैक्षणिक, सामाजिक संस्था, काळजवडे,ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | ज्ञानेश्वरी ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स, बाजारभोगाव, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | नवीन शाळा | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| ४२ | सातारा | ज्ञानगंगा शिक्षण संस्था, विद्यानगर, कराड, जि. सातारा | पवार पब्लिक स्कूल, मु.पो. पुसेसावळी, ता. खटाव,जि. सातारा | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम- २**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ जून, २०१६

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.
२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१५-१६/माध्य-क(३०१)/२९८१, दिनांक ५ मे, २०१६

प्रस्तावना -

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता नवीन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेल्या एकूण ५३०१ प्रस्तावांपैकी

३७४३ शाळांचे प्रस्ताव पात्र ठरतात. त्यानुसार या सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या ३७४३ शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन परवानगी देण्यात येत आहे.

**२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -**

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

**अ)** ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

**ब)** ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

**क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी** (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत** (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या विवरणपत्रातील यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

२.४ सदर आदेश संबधित संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची

खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०६१७१७१८५०९४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa35ecb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2016.06.18 13:45:18 +05'30'

**( रा. ग. गुंजाळ )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
९. शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण) बृहन्मुंबई
१०.सर्व संबधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपालिका
११.निवडनस्ती (एसएम-२).

| अ.क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १०४९ | पुणे | महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटीलक्ष्मी रोड , पुणे ४११०३० | हुजूरपागा गर्ल्स इंग्लिश मेडियम स्कूलराजस सोसायटी,कात्रज,पुणे ४११०४६ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.) | इंग्रजी |
| १०५० | पुणे | महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी६९१ ,नारायण पेठ , लक्ष्मी रोड , पुणे ४११०३० | हुजूरपागा इंग्लिश मेडियम प्रायमरी स्कूल६९१ ,नारायण पेठ , लक्ष्मी रोड , पुणे ४११०३० | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.) | इंग्रजी |
| १०५१ | पुणे | विब्स पब्लिक स्कूलसुर्वेय नो ४१; पेंडसे कॉलोनी ; किवळे ; विकाश नगर; देहू रोड ; पुणे 412101 | विब्स पब्लिक स्कूलसुर्वेय नो ४१; पेंडसे कॉलोनी; किवळे; विकाश नगर; देहूरोड;पुणे 412101 | दर्जावाढ | आय.सी.एस.ई | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.) | इंग्रजी |
| १०५२ | पुणे | मीरा एज्युकेशन ट्रस्ट ७०२ , मोरया हाउस , 'सी ' विंग ,लिंक रोड समोर , Near इन्फिनीटी मोल , अंधेरी (प) , मुंबई -४०००५३ | ट्री हाउस हायस्कूल कर्वे नगर स नं. 12 दुधाने नगर कर्वे नगर पुणे ४११०५२ | दर्जावाढ | आय.सी.एस.ई | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.) | इंग्रजी |
| १०५३ | पुणे | मीरा एज्युकेशन ट्रस्ट७०२ , मोरया हाउस , 'सी ' विंग , लिंक रोड समोर, इन्फिनीटी मॉल जवळ अंधेरी (प ), मुंब i - ४०००५३ | ट्री हाउस हायस्कूल कोंढवा ३८ ,पोकळे मळआ, वेलकम हॉल मागे, कोंढवा | दर्जावाढ | आय.जी.सी.एस.ई | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.) | इंग्रजी |
| १०५४ | पुणे | श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ मोईमु.मोई .पो.कुरुळी ता.खेड जि.पुणे ४१०५०१ | श्री समर्थ इंग्लिश मेडीयम स्कूल,पो.कुरुळी ता.खेड जि.पुणे. | नवीन शाळा | राज्य मंडळ | माध्यमिक (इयत्ता ९ वी. ते १० वी.) | इंग्रजी |
| १०५५ | पुणे | श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानमु.पो. मांडवगण फराटा ता. शिरूर, जि. पुणे , पिन - 412211 | नामदार श्री शरदचंद्र पवार माध्यमिक विद्यालय म.पो. मांडवगण फराटा , ता. शिरूर , जिल्हा - पुणे , पिन - 412211 | नवीन शाळा | राज्य मंडळ | माध्यमिक (इयत्ता ९ वी. ते १० वी.) | इंग्रजी |
| १०५६ | पुणे | न्यु इरा अॅकॅडमीचेतन दिलीप भंडलवालकर जवळ, 34/1,ज्ञानेश सोसायटी बिडींग भागीरथी नगर, एनडीए रोड वारजे माळवाडी ता.हवेली जि.पुणे | संस्कृती नॅशनल स्कूल136 एनडीए रोड शिवणे उत्तमनगर, ता.हवेली जि.पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | माध्यमिक (इयत्ता ९ वी. ते १० वी.) | इंग्रजी |
| १०५७ | पुणे | समृद्धी एज्युकेशन सोसायटी१/१ , ए भिलारे वाडी , कात्रज पुणे ४६ | प्यारामाउंट इंन्टरनॅशनल स्कूल१४/१ , भिलारे वाडी कात्रज पुणे ४६ | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | माध्यमिक (इयत्ता ९ वी. ते १० वी.) | इंग्रजी |
| १०५८ | पुणे | एस एम सिकीलकर एज्युकेशन सोसायटीचाकण बाजारपथ,ता.खेड जि.पुणे | शहिदा उर्दू हायस्कूल,मु.पो.करंजविहिरे,चाकण,ता. खेड जि.पुणे. | नवीन शाळा | राज्य मंडळ | माध्यमिक (इयत्ता ९ वी. ते १० वी.) | उर्दू |
| १०५९ | पुणे | दी कॉन्फरन्स ऑफ चर्चेस ऑफ क्रिस्ट इंन वेस्टर्न इंडिया मिसीन बॉय होम पोस्ट बॉक्स नं.26 पाटस रोड,टरठेअत्रे बारामती जि.पुणे. | रोसेमेरी वेस्टन इंग्लिश मिडीयम स्कूल वसंत नगर, टी.सी. कॉलेज रोड, बारामती जि.पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | माध्यमिक (इयत्ता ९ वी. ते १० वी.) | इंग्रजी |
| १०६० | पुणे | कै. उद्धवराव तुळशीराम जाधवर फौंडशनइंद्रप्रस्थ, क्रांतीनगर, सिंहगड रोड, वडगाव बु., पुणे-41 | फुलचंद चाटे माध्यमिक विद्यालयमंगलमुर्ती कॉप्लेक्स, शेवटचा बस स्टॉप, धनकवडी, पुणे 411043 | नवीन शाळा | राज्य मंडळ | माध्यमिक (इयत्ता ९ वी. ते १० वी.) | मराठी |
| १०६१ | पुणे | ब्राईट स्टार एज्युकेशन टुरीस्टश्री कुरेशी मुफाजल कबीर,फ्लॅट नं.5,ग्राउंड फ्लोअर,प्रेमवती चौल,मरोळ मोर्शी रोड मरोळ साकीनाका,मुंबई 400059 | ताक्वा इंन्टरनॅशनल स्कूलक्लोवर हायलॅन्ड एनआयबीएम कोंढवा खुर्द पुणे 411048 | नवीन शाळा | राज्य मंडळ | माध्यमिक (इयत्ता ९ वी. ते १० वी.) | इंग्रजी |
| १०६२ | पुणे | श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ मोईमु.मोई .पो.कुरुळी ता.खेड जि.पुणे ४१०५०१ | श्री समर्थ ज्युनिअर कॉलेजगेट नं. 428,नानेकरवाडी,ता.खेड जि.पुणे. | नवीन शाळा | राज्य मंडळ | उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | मराठी |
| १०६३ | पुणे | विद्या विकास एज्युकेशन सोसायटीहौस नं. 1483, मु.पो. रांजणगाव गणपती , तालुका -शिरूर , जिल्हा - पुणे पिन कोड - 412209 | श्री महागणपती ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स कॉमर्स आणि आर्ट्स मु.पो. रांजणगाव गणपती , ता. शिरूर जिल्हा - पुणे पिन कोड - 412209 | नवीन शाळा | राज्य मंडळ | उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | मराठी |
| १०६४ | पुणे | आदर्श ग्रामविकास प्रतिष्ठानमु.पो .जांबूत .ता.शिरूर .जि.पुणे | आदर्श माध्यमिक व उच्च माधायामिक विद्यालयमु. पो. जांबूत ता.शिरूर .जि.पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | मराठी |